# वसई विरार शहर महानगरपालिका
# वैद्यकीय आरोग्य विभाग

दि.०४/०७/२०२४

## प्रेसनोट

झिका हा एडिस डासांमार्फत पसरणारा एक विषाणुजन्य आजार आहे, जो दिवसा चावतो.

**झिका आजाराची चिन्हे व लक्षणे-**

झिका आजाराची लक्षणे ताप, अंगावर रॅश उमटणे, डोळे येणे, सांधे व स्नायुदुखी, थकवा आणि डोकेदुखी यांचा समावेश होतो. ही लक्षणे साधारणपणे सौम्य स्वरुपाची असतात व ती २ ते ७ दिवसांपर्यंत राहतात.

**झिका रोगाचा प्रसार मुख्य बाधित एडीस डासामार्फत**

१) लैंगिक संपर्काव्दारे २) गर्भापर्यंत संक्रमित होतो ३) आई पासून रक्त संक्रमण

**झिका आजारात काय करावे / करु नये-**

अ) **काय करावे-**

- डासोत्पत्ती स्थानांचा प्रतिबंध करणे/ नष्ट करणे.
- पाणी साठवण्याचे हौद टॅक हे घट्ट झाकणाने झाकावे.
- वापरात नसलेल्या नारळ कवटी, टायर्स, जुने व मोडकळीस आलेले साहित्य काढून टाकावे व नष्ट करावे.
- दर आठवडयास कुलर हे रिकामे करावे व घासून पुसून स्वच्छ करावे.
- पाणी साठवणुकीच्या हौद व टँक मध्ये गप्पी मासेंचा वापर करावा.
- ताप आल्यावर पॅरॅसिटोमोलं गोळी घ्यावी व नजीकच्या दवाखान्यास भेट द्यावी.
- मच्छरदाणीचा वापर घरी करावा. जेणे करुन एका पासून दुस-याला संसर्ग होणार नाही.

**ब) काय करु नये-**

- आपले घर व आजूबाजूचा परिसर अस्वच्छ ठेवू नये.
- पाणी साचू देवू नये घरातील कुलर, बकेट, बॅलर, फलॉवर पॉट, फ्रिज, नारळ कवठी यांना दुर्लक्ष करु नये.

- वापरात असलेल्या बाटल्या, जुनी टायरे, फुटकी भांडी घराच्या आजूबाजूस किंवा बाहेर टाकु नये. कारण पावसामध्ये एडिस डास या ठिकाणी वाढतात.
- ॲस्पिरीन गोळी तापासाठी वापरू नये.
- पॅरासिटामोल व्यतिरिक्त कोणतेही औषधे स्वत: घेऊ नयेत.

**जनतेसाठी आवाहन-**

१) ताप आल्यास त्वरीत सरकारी दवाखान्यामध्ये दाखवणे. कोणताही ताप अंगावर काढू नये. या आजारासाठी सर्वोत्तम निदान व उपचार महानगरपालिकेच्या दवाखान्यामध्ये मोफत आहे. तरी याचा जास्तीत जास्त लोकांनी लाभ घ्यावा.

२) खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांनी सुध्दा त्यांचेकडे अशा प्रकारचे रुग्ण दिसून आलेस त्यांनी महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागास कळवावे.

३) घरातील गावातील सर्व पाणी साठे वाहते करावेत साठवलेल्या पाण्याची भांडी कापडाने झाकून घ्यावीत.

४) जे सिमेंटचे कंटेनर रिकामे करता येत नाहीत अशामध्ये गप्पी मासे सोडावे.

५) रात्री तसेच दुपारी झोपताना मच्छरदाणीचा वापर करावा दिवसा पूर्ण कपडयांमध्ये राहावे. तसेच डास प्रतिबंधात्मक मलम यांचा वापर करावा.

६) आठवडातून एक दिवस कोरडा पाळावा ज्याच्यामध्ये भांडी धुवून, पुसुन स्वच्छ करून ठेवावी.

वैद्यकीय आरोग्य विभाग
वसई विरार शहर महानगरपालिका